# Tremendous Opportunities lie ahead for Indian Businesses with Bangladesh's Transition from LDC Status



<<Vijay Kalantri, President, All India Association of Industries (3rd left) felicitating Mohd. Lutfor Rahman, Deputy High Commissioner, Bangladesh Deputy High Commission in Mumbai (2nd left) during the programme on 'Vibrant Bangladesh: Transition from LDC Status' which was organised by World Trade Centre Mumbai and All India Association of Industries in association with the Deputy High Commission for the People's Republic of Bangladesh in Mumbai at the World Trade Centre Mumbai. Also present from (L-R): Chamari Rodrigo, Consul General, Consulate General of Sri Lanka in Mumbai; Dr. Norbert Revai Bere, Consul General, Consulate General of Hungary in Mumbai & Dean of Consular Corps in Mumbai; Mohammed Al Mamun, CEO, AB Bank in India and Y. R. Warerkar, Executive Director, MVIRDC World Trade Centre Mumbai.

## बांगलादेशामधील 'एलडीसी' स्थित्यंतरामुळे

# भारतीय उद्योजकांना बांगलादेशात संधी

**मुंबई.** गेल्या दहा वर्षांमध्ये बांगलादेशाने मोठा विकास केला आहे. अविकसनशील देश (एलडीसी) अशी पूर्वओळख असलेल्या बांगलादेशाला निम्न मध्यम स्तरातील उत्पन्न गट असलेला देश अशी नवी ओळख त्यांनी मिळवून दिली आहे. १६ मार्च रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास धोरण समितीने बांगलादेशाने 'एलडीसी' टप्पा पार केला असल्याची घोषणा केली.

या दर्जासाठी गेल्या तीन वर्षांमधील दरडोई उत्पन्न १२३० डॉलर एवढे आवश्यक होते. या काळात बांगलादेशच्या दरडोई उत्पन्नाचा आकडा १२७२ डॉलरवर जाऊन पोचला. तसेच आर्थिक असुरक्षा निर्देशांक हा जास्तीत जास्त ३२ हवा असताना बांगलादेशचा तो २५ एवढा आहे, असे मत बांगलादेशाचे भारतामधील उप उच्चायुक्त मोहम्मद लुफ्तार रेहमान यांनी व्यक्त केले. जागतिक व्यापार केंद्र, मुंबई , 'ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज' (एआयएआय) आणि बांगलादेशाचे भारतामधील उच्चायुक्तालय यांच्या संयुक्त विद्यमानाने 'व्हायब्रंट बांगलादेश : ट्रान्झिशन फ्रॉम एलडीसी स्टेटस' या विषयावरील चर्चासत्रामध्ये रेहमान बोलत होते.